| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


---

**प्रेस नोट** दिनांक : ०४/०४/२०२४

## वणी-सापुतारा रोडवर २.६१ लाखांचा अवैध गुटखा जप्त - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यावसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे ग्रामीण पोलीसांची जिल्हाअंतर्गत गुटख्याची वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द कारवाई सुरु आहे.

दिनांक ०४/०४/२०२४ रोजी वणी पोलीस ठाणे हद्दीत वणी-सापुतारा रोडवर पिंपरी फाटा परिसरात काही संशयीत इसम एका पांढरे रंगाचे स्विफ्ट डिझायर कारमध्ये गुटख्याची अवैधरित्या वाहतूक करून विक्री करण्याचे उद्देशाने येणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास मिळाली होती. त्यानूसार पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वणी पो.स्टे. हद्दीत पिंपरी फाटा परिसरात सापळा रचून, पाठलाग करून स्विफ्ट डिझायर कार क्र.एम.एच.१५-ई.बी.०७३१ मध्ये अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणारे इसम नामे १) नवाज नुर शेख, वय ५०, रा. वणी, ता. दिंडोरी, २) मकसुद महंमद सैय्यद, वय ३७, रा. इंदिरानगर टेकडी, वणी, ता.दिंडोरी यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांचे कब्जातून २,६१,८००/- रूपये किंमतीचा अवैध गुटखा, स्विफ्ट डिझायर कार, मोबाईल फोन असा एकुण ५,७३,८००/- रू. किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील इसम हे महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठा व साठयास प्रतिबंधीत असलेला गुटखा, सुगंधीत/स्वादीष्ट तंबाखू, पानमसाला, सुगंधीत स्वादीष्ट सुपारी व तत्सम गुंगीकारक पदार्थ मानवी शरीरास सेवन करण्यास अपायकारक आहे, हे माहिती असतांना देखील स्वत:चे फायद्यासाठी अवैधरित्या गुटखा विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळून आले असून त्यांचेविरूध्द वणी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक सन २०२४ च्या पार्श्वभुमीवर जिल्हयाचे सीमावर्ती भागांतून गुटखा व मद्याची अवैधरित्या होणारी तस्करी रोखण्यासाठी तीव्र स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शनानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोनि श्री. गणेश म्हस्के, पोउनि दत्ता कांभीरे, सपोउनि शिवाजी ठोंबरे, पोहवा प्रविण सानप, चेतन संवत्सरकर, किशोर खराटे यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.